# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र. तंशिप्र-१२२३/प्र.क्र. ०६/प्रवेश प्रक्रिया/२०२४/१२८८ दिनांक :३०/०७/२०२४

# जाहिर सूचना

## प्रथम वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाकरीता नीट युजी २०२४ च्या निकाला आधारे प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांकरीता महत्वाची सुचना

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता तंत्रशिक्षण विभागांतर्गत असलेल्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेची नोंदणी प्रक्रिया दिनांक १४ जुलै, २०२४ रोजी सुरु करण्यात आलेली आहे. प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील काही अभ्यासक्रमांना एमएचटी सीईटी (पीसीबी ग्रुप) २०२४ व नीट युजी २०२४ ही सामाईक प्रवेश उमेवारांनी प्रवेश प्रक्रियेकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरुन त्याची पडताळणी करुन निश्चित केलेले आहेत. देशपातळीवर राष्ट्रीय परीक्षा एजेंन्सी, नवी दिल्ली यांचेमार्फत दिनांक ०५ मे, २०२४ रोजी झालेली नीट २०२४ या सामाईक प्रवेश परीक्षेचा निकाल दिनांक २३ जून, २०२४ रोजी जाहिर झालेला होता. तदनंतर राष्ट्रीय परीक्षा एजेंन्सी यांनी दिनांक २३ जून, २०२४ रोजी १५६३ उमेदवारांची पुन्हा परीक्षा घेण्यात आली. तदनंतर मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दिलेल्या आदेशानुसार राष्ट्रीय परीक्षा एजेंन्सी ने सर्व उमेदवारांचा सुधारीत अंतिम निकाल दिनांक २६ जूलै, २०२४ रोजी घोषित केलेला आहे.

प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाकरीता ज्या उमेदवारांनी नीट परीक्षेच्या निकालाच्या (Percentile) आधारे नोंदणी केलेली आहे अशा उमेदवारांच्या सुधारीत निकालाची नोंद अर्जामध्ये अद्यावयात करण्याकरीता सदर उमेदवारांनी दिनांक ०४/०८/२०२४ व ०६/०८/२०२४ (Grievance Period) या कालावधीत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

१. ज्या उमेदवारांनी सुविधा केंद्रावर जाऊन अर्जाची प्रत्यक्ष पडताळणी (Physical Scrutiny) केलेली आहे अशा उमेदवारांनी पुन्हा नीट युजी २०२४ या परीक्षेची सुधारीत गुणपत्रिका सोबत घेवून जाऊन सुधारीत निकालामधील (Percentile) नोंद करुन व सुधारीत गुणपत्रिका अपलोड करुन सुविधा केंद्राकडून पडताळणी करुन घेण्यात यावी.
२. ज्या उमेदवारांनी ई. पडताळणी (E-Scrutiny) पध्दतीने अर्जाची पडताळणी करुन घेतलेली आहे अशा उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने स्वत:च्या लॉगीनमधून Grievance दाखल करुन नीट युजी २०२४ या परीक्षेचे सुधारीत गुण भरुन व गुणपत्रकाची प्रत अपलोड करुन ई पडताळणी करीता नव्याने सादर करण्यात यावा.

सही/-

**आयुक्त,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**